# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/2817/2025-26

दि.23/02/2026

प्रति,
सिस्टिम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- भारताची जनगणना - 2027 करीता मिरा भाईदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) व जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक यांची नियुक्ती करणेबाबतची जाहिर सूचना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत...

भारताची जनगणना - 2027 करीता मिरा भाईदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणना करण्याच्या कामकाजाकरीता तात्पुरत्या स्वरुपात करारपध्दतीने सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) व जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक यांची नियुक्ती करणेबाबतची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. (सोबत जाहिर सूचनेची छायांकित प्रत)

(डॉ.सचिन बांगर)
शहर जनगणना अधिकारी तथा
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/2815/2025-26 दि.23/02/2026

**सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) व जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक या पदावर सेवाकरार पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**।।जाहीर सूचना।।**

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे, भारताची जनगणना-2027 करीता मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील संपूर्ण लोकसंख्या गणनेसाठी त्यांच्या आस्थापनेवरील खालील नमुद पद तात्पुरत्या स्वरूपात जनगणनेचे कामकाज पूर्ण होईपर्यंत सेवा करारपद्धतीने भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेद्वारांची थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे.

इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दि.27/02/2026 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत मा.स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि.ठाणे 401101 येथे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk in Interview) उपस्थित राहावे.

**उपलब्ध पद संख्या :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) (जनगणनेकरीता) | 01 | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) जनगणना करीता काम केल्याचा अनुभव आवश्यक. |
| 2. | जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक | 02 | मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची/माहिती तंत्रज्ञानातील विज्ञान पदवी. |

**प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) पदाकरीता अटी व शर्ती :-**

1) उमेदवार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2) उमेदवार यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी धारण केलेली असावी व त्यांस जनगणना करीता काम केल्याचा अनुभव असावा.
3) करारपध्दतीने नेमणूकीकरीता सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 70 वर्षापेक्षा अधिक नसावे.
4) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती ही जनगणना कालावधीपर्यंत राहिल.
5) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
6) प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02) यांना या पदासाठी रक्कम रु.40,000/- प्रति महिना इतके मानधन अदा करण्यात येईल.
7) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
8) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
9) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्याच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

Scanned with OKEN Scanner

10) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

**<u>जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक पदाकरीता अटी व शर्ती :-</u>**

1) उमेदवार यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी शाखेची/माहिती तंत्रज्ञानातील विज्ञान पदवी धारण केलेली असावी.
2) जनगणना तांत्रिक सहाय्यक यांची वयोमर्यादा किमान 18 वर्षे ते कमाल 38 वर्षे इतकी राहिल.
3) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती ही जनगणना कालावधीपर्यंत राहिल.
4) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
5) जनगणना तांत्रिक सहाय्यक यांना या पदासाठी रक्कम रु.25,000/- प्रति महिना इतके मानधन अदा करण्यात येईल.
6) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.
7) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा पदाच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
8) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

**<u>निवड प्रक्रिया</u>** :-

सेवानिवृत्त "प्रशासकीय अधिकारी (वर्ग-02)" व "जणगणना करीता तांत्रिक सहाय्यक" या पदासाठी उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.

- ➢ प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(डॉ.सचिन बांगर)
शहर जनगणना अधिकारी तथा
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मंजुरीने)

Scanned with OKEN Scanner